
'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार'
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

NAAC Accredited "A" with CGPA- 3.24 in 3rd cycle 58th Rank in India Ranking 2017, by NIRF (MHRD)

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित
विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर



# विवेक NEWS

• प्रबंध संपादक
प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर
• कार्यकारी संपादक
डॉ. दीपक रामा तुपे
डॉ. प्रदीप पाटील
• सहाय्यक संपादक
प्राजक्ता पाटोळे, बी. ए. १
नंदीनी काकडे, बी. ए. ३
तेजस्विनी शितोळे, बी. ए. १
काजल इंडिकर, बी. ए. १
पूजा कोलकार, बी. ए. १
अनुष्का सावंत, बी. एस्सी. १

वर्ष : ५ | अंक : ११ | जानेवारी, २०१९ | पाने चार | पान नं. १ | स्वागत मूल्य : १ रुपया

## संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांची जयंती साजरी



कोल्हापूर, दि. ४: श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या सुविद्य पत्नी, संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांची ९१ वी जयंती विवेकानंद कॉलेजमध्ये साजरी करणेत आली.

संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विवेकानंद शिक्षण संस्थेच्या उभारणीच्या कार्याला अत्यंत महत्त्वपूर्ण साथसोबत दिली. शिक्षणप्रसाराचे खडतर कार्य करणाऱ्या डॉ. बापूजींच्या कार्याच्या मागे त्या उभ्या राहिल्या. वसतिगृहातील अनाथ मुला-मुलींचे त्यांनी संगोपन केले. आजारपणात त्यांनी मुलांची सेवासुश्रूषा केली व त्यांना शिकण्याचे धडे दिले. त्यांचे हे कार्य सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे.

यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी संस्थामातांच्या व डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी संस्थामातेच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, संस्थामाता ह्या सर्वांच्या गुरूमाऊली व ज्ञानमाऊली आहेत. त्यांनी त्याग, सेवा, समर्पण व ममत्वाच्या भावनेने गोरगरिबांच्या मुलांना घडवण्याचे काम केले. अनेक मुलांच्या त्या आई झाल्या. शिक्षणाच्या समाजभावी कार्यात संस्थामाता म्हणजे ईश्वराचे साक्षात्कारी रूप होते. प्रा. बी. एस. नागनूर यांनी आभार मानले

**शब्दांकन : काजल इंडिकर**

## बापूजी संस्कारक्षम पिढीचे नंदादीप

### ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत मा. प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर, दि.२३ : ज्ञान, विज्ञानाने प्रगत आणि संस्कारमूल्याने संपन्न माणूस घडविण्यासाठी डॉ. बापूजींनी विवेकानंदांच्या आदर्शवादी तत्त्वज्ञानाला अनुसरून विवेकानंद शिक्षण संस्था उभी केली आणि खेड्यापाड्यातील व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे शैक्षणिक व सामाजिक जडणघडण करणारे संस्कारक्षम पिढीचे नंदादीप आहेत, असे विचार साताऱ्याच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी व्यक्त केले. ते शिवाजी विद्यापीठ व विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमालेत 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : ज्ञानसंस्कृतीचे दूत' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



**शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमालेत बोलताना डॉ. यशवंत पाटणे. सोबत संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे व इतर मान्यवर.**

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले की, बापूजींच्या तत्त्वज्ञानाचा व कार्याचा प्रभाव समाजावर पडल्याने समाजातील थोर विचारवंत व गुरूदेव कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी उभे राहिले. शिक्षणातून त्यागमय वृत्तीने समाजाची सेवा करणारे बापूजी सच्चे देशभक्त होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. प्रास्ताविक व स्वागत विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले. आभार प्रा. बी. के. गोसावी यांनी मानले.

**शब्दांकन : नंदिनी काकडे**

## सुसंस्कृत पिढीसाठी शिक्षण : पाटील

कोल्हापूर, दि. ०१ : गरीबी असली तरी संस्कृती जगली पाहिजे. गरिबीचे दुष्टचक्र थांबवायचे असेल तर गुणवत्ताधारक पिढी निर्माण करायला हवी. सध्या समाजात अर्धशिक्षित, अर्धसंस्कृत पिढी तयार होत आहे. ही पिढी सामान्य माणसाला सरळ मार्गाने जीवन जगू देणार नाही. यासाठी शिक्षणव्यवस्था जगली पाहिजे. जर शिक्षणव्यवस्था उद्‌ध्वस्त झाली तर भारताबरोबरच त्याचे दुष्परिणाम जगाला भोगावे लागतील. यासाठी शिक्षण हाच एकमेव पर्याय आहे की ज्यातून सुसंस्कृत विद्यार्थ्यांची पिढी निर्माण होईल, असे विचार 'नॅक' सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी व्यक्त केले. ते विवेकानंद कॉलेजच्या वतीने आयोजित 'नॅक'चे सुधारित पुनर्मुल्यांकन या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. आभार डॉ. श्रुती जोशी यांनी मानले.

**शब्दांकन : अनुष्का सावंत**

## विवेकी विद्यार्थी घडविणे आजच्या शिक्षणाची गरज

### गुणी विद्यार्थी गौरव समारंभात जिल्हा पोलिस प्रमुख डॉ. अभिनव देशमुख यांचे मत

कोल्हापूर, दि. २२ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ६० वर्षांपूर्वी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन करून खेड्यापाड्यातील दुर्गम भागापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवली, म्हणूनच माझ्यासारखी दुसरी पिढी उच्च शिक्षण घेऊ शकली. आजच्या डिजिटलच्या युगात गुगलला गुरू व व्हॉटसअपला युनिव्हर्सिटी मानले जात आहे. वास्तव, ज्ञान आणि माहिती यामध्ये आज फारकत होत आहे. वास्तवाचे रूपांतर ज्ञानामध्ये व माहितीचे रूपांतर शहाणपणामध्ये जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विवेकी विद्यार्थी घडू शकत नाही. त्यामुळे विवेक संपन्न विद्यार्थी घडविणे ही आजच्या शिक्षणाची गरज आहे, असे विचार कोल्हापूर जिल्हा पोलिसप्रमुख अभिनव देशमुख यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.



**गुणी विद्यार्थी गौरव समारंभात बोलताना कोल्हापूर जिल्हा पोलिसप्रमुख अभिनव देशमुख व इतर मान्यवर**

प्राचार्य अभयकुमार साळुंखे व संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी विचार व्यक्त केले. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते १२ वी बोर्ड व विद्यापीठ परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी, कला, क्रीडा, सांस्कृतिक विभाग, एन. सी. सी., एन. एस. एस. मधील उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरूवात संस्थेच्या प्रार्थना गीताने करण्यात आली. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले. या समारंभास विवेकानंद कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. अशोकराव जगताप, डॉ. हिंदुराव पाटील, मुरलीधर गावडे, बाबासाहेब मोहिते उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. पी. ए. पाटील व प्रा. राजश्री पाटील यांनी केले. आभार डॉ. डी. बी. पाटील यांनी मानले.

**शब्दांकन : तेजस्विनी शितोळे**

## 'विवेकानंद' अव्वल

कोल्हापूर.दि.१०: शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे यांनी १९९८ सालापासून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर आधारित शिष्यवृत्ती देण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला. हा उपक्रम सुरू झाल्यापासून आजवर सलग २० वर्षे सर्वाधिक शिष्यवृत्ती मिळवून विवेकानंद कॉलेज शहरी विभागात प्रथम राहिले असून, यानिमित्त दरवर्षी महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा सत्कार मा. कुलगुरूंच्या हस्ते होत असतो. याही वर्षी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेमध्ये चमकदार कामगिरी करून शहरी विभागातून कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखांमध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. त्यानिमित्त शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचा शाल व प्रशस्तिपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या वर्षी विद्यापीठाच्या एकूण शिष्यवृत्तीपैकी 'विवेकानंद'च्या ९७ शिष्यवृत्ती प्राप्त झाल्या.

**शब्दांकन : प्राजक्ता पाटोळे.**

## राज्यस्तरीय सांस्कृतिक महोत्सव उत्साहात

### शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी राज्यस्तरीय विद्यार्थी सांस्कृतिक स्पर्धा संपन्न



**कार्यक्रमात बोलताना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे.**

कोल्हापूर, दि. २९ : विद्यार्थ्यांमधील कला, क्रीडा व गुणवत्ता विकसित करण्यासाठी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने विवेकानंद कॉलेजच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये राज्यस्तरीय सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या महोत्सवात संस्थेच्या विविध शाखांतील पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक गटातील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, गायन, वादन, एकांकिका या कला प्रकारात सहभाग घेतला.

लोकनृत्य स्पर्धा : पूर्वमाध्यमिक लोकनृत्य स्पर्धेत नवी मुंबई वाशी (इंग्रजी माध्यम) यांचा प्रथम क्रमांक आला, तर प्राथमिक लोकनृत्य स्पर्धेत श्री कात्रेश्वर हायस्कूल, कातरखटावने प्रथम क्रमांक मिळविला. माध्यमिक लोकनृत्य स्पर्धेत महर्षी शिंदे विद्यामंदिर, वाईने प्रथम क्रमांक प्राप्त केला. तर उच्चमाध्यमिक लोकनृत्य स्पर्धेत भवानी विद्यामंदिर व ज्युनि. कॉलेज, साताराने प्रथम क्रमांक पटकावला. या महोत्सवाचे उद्‌घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे शुभहस्ते व संस्था सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्था सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. युवराज भोसले, शाहीर कुंतिनाथ करके, माजी सहसचिव आर. के. भोसले यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी सांस्कृतिक महोत्सवाचे पारितोषिक वितरण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. पारितोषिक वाचन प्रा. एम. ए. पीरजादे यांनी केले. महोत्सवाच्या समारोपप्रसंगी संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी आभार मानले.

प्रास्ताविक कला व सांस्कृतिक महोत्सवाचे अध्यक्ष प्राचार्य बी. एन. माळी यांनी केले. स्वागत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे व राजश्री पाटील यांनी केले. आभार डॉ. ए. एस. महात यांनी मानले.

**शब्दांकन : अभिषेक गुरव**

## कापडी पिशव्यांचे वितरण

कोल्हापूर दि. ११ : प्लास्टिक हा विज्ञानाने दिलेला शाप आहे, कारण प्लास्टिक कचरा डीकंपोज होत नाही. त्यातून पर्यावरणाची हानी होते. हीच पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांच्या निधीतून एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागाच्या वतीने प्लास्टिक मुक्ती भारत अभियान अंतर्गत मोफत कापडी पिशव्यांच्या वाटपाचा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. कापडी पिशव्यांच्या वापरामुळे घराघरांमध्ये प्लास्टिक मुक्तीचा संदेश पोहोचेल व पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल, असे विचार विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.एच. पी. पाटील हे होते.



प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर पुढे म्हणाले, या पिशव्यांचे महत्त्व पर्यावरणाच्या दृष्टीने खूप आहे. ही पिशवी लोकांचे प्रबोधन करते. ही पिशवी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार व प्लास्टिक मुक्तीचा संदेश देते. तसेच या उपक्रमामुळे होम सायन्स विभागाच्या विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांची शिलाई व छपाईचे प्रशिक्षण मिळते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन करून करण्यात आली. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. वाय. डी. हरताळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले. आभार प्रा. ए. एस. कदम यांनी मानले.

**शब्दांकन : पल्लवी कांबळे**

विवेकNEWS



## स्त्री मुक्तीची जागतिक मोहीम '#मी टू'

कधी तर होणारच होते. फक्त केव्हा? कुठे? आणि कसं? हेच प्रश्न होते. जसे शिशुपालाचे १०० गुन्हे पूर्ण झाल्यानंतर कृष्णाकडून त्याचा विनाश अटळ होता. तसे स्त्रियांवरील लैंगिक अत्याचाराचा घडा केव्हाच भरला होता... किंबहुना वाहूनही गेला होता, त्यामुळे त्याविरोधात खणखणीत आवाज उठवणं.. उठणं अपरिहार्य होतं. त्याचंच फलित म्हणून इतक्या मोठ्या संख्येने जगभरातील स्त्रिया एकत्रित येऊन स्वत:वरील लैंगिक अत्याचाराविरुद्ध बोलायला लागल्या. त्याअगोदर मात्र स्त्रिया पुरुषांकडून होणारा लैंगिक छळ मग तो बलात्काराच्या स्तरावरचा असू दे किंवा विनयभंग, अश्लिल टिपण्या, छेडछाड असू दे. या छळाचे अनुभव उघड करायचे नाहीत, हे संस्कार मुलीवर आधीपासूनच घरात केले जातात. अशा परिस्थितीत एखाद्या मुलीने किंवा स्त्रीने तिच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध तोंड उघडले तर अविश्वास दाखवला जाण्यापासून चिखलफेकीपर्यंत सगळे काही तिला एकटीला सहन करावे लागते. समान हक्कांसाठी लढणाऱ्यांनी एकत्र येणे हे अत्यंत नैसर्गिक आणि तेवढेच आवश्यक आहे. मग आज कोट्यवधी स्त्रिया परुषांच्या लैंगिक अत्याचाराला बळी पडत असताना, त्याविरुद्ध उभ्या राहणाऱ्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या का असतात? त्यांची संघटना का उभी रहात नाही? बलात्कारासारख्या घटनांनंतर स्त्रिया मोर्चे वगैरे काढतात, पण लैंगिक छळाविरुद्ध लढणारी बाई एकटीच का असते? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करणारी एक ऑनलाइन चळवळ उभी राहत आहे. 'मी टू' किंवा '# Me too'. सामाजिक कार्यकर्त्या टमारा वर्क यांनी २००६ मध्ये ही संज्ञा वापरली. लैंगिक छळाला बळी पडलेल्या स्त्रियांना सहानुभूतीच्या पलीकडे जाऊन आधार देण्यासाठीची ही संकल्पना. 'मी टू' चळवळीला खऱ्या अर्थाने चालना मिळाली ती २०१७ च्या अखेरीस. तर १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी अमेरिकी अभिनेत्री आलिसा मिलानोने या संकल्पनेचा वापर करून ट्विटरमार्फत आवाहन केले की, लैंगिक छळाला बळी पडलेल्यांनी 'मी टू' हा हॅशटॅग स्टेटस म्हणून ठेवावा आणि आपले वैयक्तिक अनुभव मांडावेत, जेणेकरून या समस्येचे गांभीर्य सर्वांच्या लक्षात येईल. आलिसाच्या आवाहनानुसार 'मी टू' हॅशटॅग ठेवण्याचा तसेच तिचे ट्विट पुन्हा रि-ट्विट करणाऱ्यांच्या संख्येने पाच लाखांचा टप्पा अल्पावधीत ओलांडला. 'मी टू' ही चळवळ अमेरिकेतून सुरू झाली असली, तरी खरे तर तिला भौगोलिक सीमा अशा नाहीत, कारण ही सोशल मीडियामार्फत चालविली जाणारी ऑनलाईन चळवळ आहे. लैंगिक छळाची समस्या जगाच्या कानाकोपऱ्यात कशी सारख्याच तीव्रतेने अस्तित्वात आहे. याचे पुरावे देणाऱ्या पोस्ट जगभरातून पडू लागल्या. सन २०१८ सालात 'मी टू' हा हॅशटॅग ठेवणाऱ्या ट्विट-रि-ट्विट करणाऱ्यांच्या संख्येने कित्येक लाखांचा टप्पा ओलांडला. किमान ८५ देशांमध्ये हा हॅशटॅग ट्रेण्डिंग आहे.

भारतातही 'मी टू' चळवळीला स्त्रियांनी उदंड प्रतिसाद दिला. यात सहभागी झालेल्या भारतीय स्त्रियांचे वैशिष्ट्य म्हणजे तारुण्यात पदार्पण केलेल्या मुली बहुसंख्येने आहेत. २०१३ मध्ये छेडछाडीविरोधात झालेली ब्लॅक नॉइज चळवळ, २००९ मध्ये मॉरल पोलिसिंगविरोधात झालेली 'पिंक चड्डी' चळवळ याच्या तुलनेत २०१५ मध्ये झालेली 'पिंजरा तोड' चळवळ आणि २०१७ मध्ये झालेली 'बेखौफ' चळवळ व 'आझादी' चळवळ यांची व्याप्ती खूप मोठी आहे. 'मी टू' मध्येही खूप मोठ्या संख्येने स्त्रिया सहभागी होत आहेत. मुख्य धारेतील स्त्रीवादी चळवळीने हुंडाबळी, स्त्री शिक्षण, बलात्कार यांसारख्या अधिक गंभीर वाटणाऱ्या समस्यांवर लक्ष्य केंद्रित केले असल्याने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळावर तोडगा काढण्यासाठी ही मोहीम उपयुक्त आहे, अशी भूमिका मांडली गेली. लैंगिक अत्याचाराविरुद्ध लढणाऱ्या स्त्रीच्या वाट्याला नेहमीच नामुष्की आणि एकांतवास आला. त्याउलट ज्याने अत्याचार केला तो मात्र अनेकदा उजळ माथ्याने वावरत राहिला. म्हणूनच 'मी टू' मोहिमेत दिलेला तू एकटी नाहीस, मीसुद्धा तुझ्यासारखीच आहे म्हणूनच तुझ्याबरोबर आहे हा सहानुभूतीचा भाव महत्त्वाचा ठरतो. जगभरातील बहुतांश स्त्रिया बलात्कार वा विनयभंगाला केव्हा ना केव्हातरी बळी पडल्या आहेतच, म्हणून या मोहिमेमुळे तू भ्रष्ट झालीस, तुझीच चूक असणार, हा कलंक नाहिसा व्हायला मदत झाली आणि त्याविरोधात आवाज उठवणं शक्य झालं. भारतातल्या पत्रकार लेखिका मेघना पंत यांनी या चळवळीचे वर्णन चहा भरपूर उकळावा, पण नंतर पिण्यास विसरून जावे. अशा शब्दात केले आहे. हे घडण्याचा धोका नाकारता येत नाही. अमेरिकेत संबंधित कायद्यात सुधारणेचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. मुळात लैंगिक छळाचे मूळ समाजाच्या पुरुषप्रधान मानसिकतेत दडले आहे. स्त्री-पुरुष समानता खऱ्या अर्थाने समाजात रुजेल, तेव्हा कोणत्याही व्यक्तीकडून विषमलिंगी व्यक्तीचा छळ केला जाण्याची शक्यता खूप कमी होईल. यासाठी केवळ 'मी टू' एवढे म्हणून पुरणार नाही, तर हे का घडते आणि ते कसे थांबवता येईल याचा विचारही झाला पाहिजे. अगदी बालपणापासून आपल्याकडे रुजवले जाणारे साचे मोडून एका लिंगनिरपेक्ष समाजाच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. या प्रयत्नात कोणीही एकटे पडणार नाही याची काळजी घेण्यासाठी 'मी टू' सारख्या चळवळीस मदत करतीलच. अशा पद्धतीने जागतिक स्तरावर एकत्र येऊन मौनापासून मुक्ती, लाज आणि भायापासून सुटका करण्याचे उद्दिष्ट या मोहिमेत ठरवले.

- प्राजक्ता पाटोळे, बी. ए. भाग १
- अभिषेक गुरव, बी. ए. भाग १

## सुसंस्कारी समर्पिता, संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे



तारांगण कोणी पाहिले का? यातं असंख्य तारकांचा पुंज दिसतो. यात आपल्याला जो आकर्षित करतो, आपले लक्ष वेधून घेतो तो म्हणजे तेजस्वी शुक्रतारा. असेच शुक्र ताऱ्याप्रमाणे असणारे व्यक्तिमत्त्व जे महाराष्ट्राच्या क्षितिजावर चमकले ते म्हणजे शिक्षणमहर्षी परमपूज्य डॉ. बापूजी साळुंखे. बापूजींनी, दुर्गम भागात ज्ञानाची गंगोत्री पोहोचवली. बापूजींनी लावलेल्या या इवल्याशा रोपट्याचं रूपांतर आता वटवृक्षात झाले आहे, हे आपण सर्वांनी पाहिले आहे.

असे म्हटले जाते एका यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हात असतो. हे अगदी खरे आहे; कारण बापूजींनी अत्यंत खडतर परिस्थितीतून स्वामी विवेकानंद शैक्षणिक संस्थेचा वटवृक्ष उभा केला. ते हे करू शकले, कारण त्यांना मोठा आधार होता, लाखमोलाची साथ होती, ती म्हणजे त्यांच्या धर्मपत्नी, धर्मसहचारिणी अर्धांगिणी, समर्पिता, संस्थमाता सुशीलादेवी साळुंखे. सुशीलादेवी पूर्वीच्या सुशीला दत्ताजीराव चव्हाण-पाटील. दत्ताजीराव हे बेळगांवमधील एक सुप्रतिष्ठीत, स्वाभिमानी गृहस्थ, शेती-व्यवसायाने सधन असलेले हे कुटुंब. दत्ताजीरावांच्या पोटी सन १९२६ रोजी एक सुमधूर फळ जन्मास आले, ते म्हणजे सुशीलादेवी. जन्मानंतर काही दिवसांतच त्यांच्या मातोश्री परलोकी गेल्या. दत्ताजीरावांवर आभाळ कोसळले. मातृप्रेमसुध्दा वडिलांनीच त्यांना दिले. वडील हाडाचे शेतकरी. नकळत ही काळ्या मातीत वाढलेली माय. सगळ्यात धाकटी असल्यामुळे लहान वयातच सर्व जबाबदारी त्यांच्यावर पडली. त्या घरी आलेल्या नातेवाईक, व्याही मंडळी, नोकरचाकर यांचा अगदी प्रेमाने आदरसत्कार करीत. एक तीळ वाटून खावा, जे असेल त्यात समाधान मानावे अशा मानसिकतेत ही स्त्री संस्कारसंपन्न झाली. धाकटी असूनही लहान वयातच जबाबदारीचे भान आले.

सुशीलादेवींवर लहानपणापासूनच अध्यात्माचे संस्कार झाले. म्हणूनच त्यांच्या सौंदर्याबरोबरच मानसिक उंचीकडे पाहून बेळगावचेच असलेले व बापूजींवर पुत्रवत प्रेम करणारे डॉ. आप्पासाहेब पवार यांनी साळुंखे घराण्यात या कन्येला बापूजींशी विवाह-करायला लावला. सन १९४० साली बेळगावच्या भाळावरच्या मारुतीच्या मंदिरात बापूजी व सुशीलादेवी यांचा विवाह संपन्न झाला. सुशीलादेवींच्या वडिलांनी आपल्या लेकीचे कन्यादान करताना, पाणावलेल्या डोळ्यांनी पतीचे व्रतस्थ जीवन सांगून आपल्या पतीला सुखी ठेवून खरी सहचारिणी हो। असा आशीर्वाद दिला. सत्यम् वद धर्मचर बघता-बघता ८६ वर्षांपर्यंत ही स्त्री संस्थामाता झाली.

बापूजी ज्ञानदानासाठी महाराष्ट्रभर पायपीट करीत. त्यामुळे सुशीलादेवींच्या अरुणा, अभयकुमार, सुधा, शरद, दीपक, विद्या या भावंडांच्या बाळतपणात ना पतीची साथ ना सासूची. डॉ. बापूजीं साळुंखे यांच्याबरोबर महाराष्ट्रभर त्यांची भटकंती झाली. विंचवाचे बिऱ्हाड घेऊन फिरणाऱ्या सुशीलाबाईंची मानसिकता 'धान थोडं असलं तरी मन सुपाएवढं पाहिजे', अशी होती. त्यांनी ना कधी बापूजीकडे तक्रार केली, ना कधी मागण्या केल्या. हाताला आणि पोटाला चटके बसले तरी कधीही त्यांच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता ढळली नाही. एकदा बापूजींना दवाखान्यात ठेवले असताना संस्था, वसतिगृह, घर, शाळा, मुलं सगळी कामे त्या एकट्या निभावायच्या. म्हणूनच त्यांना संस्थामाता असे संबोधतात. बापूजींच्या सहवासात त्या बहुश्रुत होत गेल्या. बापूजींनी लावलेल्या विवेकपूर्ण शिक्षण संस्थेच्या या रोपाचा वटवृक्ष झाला. अचानक बापूजींची प्रकृती खालावली. कोणतेही उपचार काम करेनात. आठ वर्षे सुशीलादेवींनी बापूजींची सुश्रुषा केली. पण अखेर ८ ऑगस्ट, १९८७ चा काळा दिवस उगवला आणि बापूजी आपल्यातून निघून गेले. बापूजींच्या निधनानंतर एखाद्या संन्यासिनीचे जीवन त्या जगल्या. शिक्षणसंस्थेची सेवा केली. सुशीलादेवी सर्वांगाने आणि सर्वभावाने बापूजींच्या जीवनाशी व संस्थेच्या जीवनाशी तारतम्य पाहून जागल्या म्हणूनच समर्पिता हे विशेषण त्यांच्या नावाशी जोडले जाते. सुशीलादेवी सगळ्या संकटांवर मात करून खंबीरपणे संस्थेची जबाबदारी पार पाडतात. तेव्हा त्या मला पहाटे उगवणाऱ्या सूर्यासारख्या वाटतात. कारण पहाट ही अंध:काराला छेदून उष:कालाकडे जाते, नवे तंत्र घेऊन येते. त्याग व सेवाभावी वृत्तीतून ज्ञान व विज्ञान देण्याचं काम बापूजींनी केले तर सुसंस्कार देण्याचं काम सुशीलादेवींनी केले. अशा या देवरूपी सुशीलादेवींची २२ ऑक्टोबर २०१३ रोजी संध्याकाळी प्राणज्योत मालवली. हजारो लोकांची माता बनलेल्या व संसारसुखाची सावली देणाऱ्या संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे अनंतात विलीन झाल्या.

- नंदीनी काकडे, बी. ए. भाग-३

## 'विवेकानंद'चे पंचगंगा प्रदूषणमुक्ती अभियान

प्रत्येक शैक्षणिक संस्थानाचं खऱ्या अर्थाने समाजाप्रती काहीतरी देणं लागतं. हीच देण्याची भावना जपत गेली दोन वर्षे कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजचे पंचगंगा प्रदूषणमुक्ती अभियान अव्याहतपणे चालू आहे. ज्ञानाचे रूपांतर व्यवहारात करणे याला विज्ञान म्हणतात. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या या तत्त्वाचा वसा आणि वारसा विवेकानंद कॉलेज जपत आहे. हा उपक्रम पर्यावरणाची हानी टाळण्याच्या दृष्टीने व सामाजिक सलोखा व जनजागृती करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. कोल्हापूरची जीवनवाहिनी असलेल्या पंचगंगा नदीत दररोज हजारो टन कचरा नागरिक टाकत असतात. ते या ना त्या कारणाने नदी प्रदूषणात भर घालत असतात.



ही गोष्ट श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या लक्षात आली. त्यांनी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांना या योजनेची अंमलबजावणी करण्यास सांगितले. ही प्रेरणा घेत विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना व नॅशनल कॅडेट कोर्सच्या वतीने विद्यार्थ्यांनी जणू पंचगंगा नदीप्रदूषणापासून वाचविण्याचा विडाच उचलला आहे. महाविद्यालयाने हा उपक्रम ४ जुलै, २०१७ रोजी सुरू केल्यापासून आजतागायत एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी अव्याहतपणे पंचगंगा नदीला प्रदूषणविरहीत करण्याचा प्रयत्न करत आहेत. हे स्वयंसेवक व कॅडेट दररोज सकाळी पंचगंगा घाटावर जातात, तेथे पाणीप्रदूषण करणाऱ्या लोकांचे प्रबोधन करतात. नदीतील कचरा बाहेर काढतात व नदीला खऱ्या अर्थाने प्रदूषणाच्या विळख्यातून बाहेर काढतात. विवेकानंद कॉलेजने ही सामाजिक बांधिलकी जपत समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. समाजाशी नातं जपणारा असा हा नावीन्यपूर्ण उपक्रम एखाद्या कॉलेजच्या वतीने सुरू करण्याचा तो अव्याहतपणे चालविण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांना खऱ्या अथनि समाजिक जाणीव निर्माण करून्न देणारा आहे. मला वाटतं असा नावीन्यपूर्ण उपक्रम महाराष्ट्रात विवेकानंद कॉलेजने पहिल्यांदाच सुरू केला व तो अव्याहतपणे चालू ठेवला आहे. किंबहुना तो आजही चालू आहे. जो की इतरांनासुद्धा आदर्शवित आहे.

- कु. अनुष्का सावंत बी. ए. भाग-१

## मानवता हाच धर्म!

आताच समाजात घडलेली घटना म्हणजे हरिजन धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला गेला, पण तो अयोग्यरीत्या बौध्द धर्म स्वीकारण्याआधी हे लोक ज्या देवाची पूजा-आर्चा करत होते, ज्या देवाला मागणी घालत होते, त्याच देवाला जाळलं गेलं. देवाला ही स्वार्थाशिवाय जवळ करू शकत नाहीस, तर माणसातला माणूस तरी कसा ओळखशील तू. अरे नको मानू कोणताच धर्म. परमेश्वर एकच आहे. जसा परमेश्वर एक आहे, तसाच मानवधर्म ही एकच आहे. या जगात नको करू धिंगाणा धर्म व जातीचा. कोणा-कोणाचा राहणार नाही, सगळे स्वार्थी होतील. सगळीकडे दंगे होतील. कधी देवांनीही धर्म पाळा म्हणून नाही सांगितलं आणि प्रत्येकाला बनवतानाही सारखं बनवलं. मग तू कोन आहेस? धर्म हा नावपुरता राहू दे. नको करू त्याचा वाईट प्रचार. नको मानू तू जात-धर्म. माणसातला माणूस आहेस, नको मानवधर्म सोडू तू.

- कु. अमृता संकपाळ,

# दहशतवाद मानवतेचा शत्रू

दहशतवादी संघटना आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सगळ्या मानवजातीला वेठीस धरू पहात आहेत. आज हाच दहशतवाद मानवतेचा शत्रू बनला आहे.

### एकत्रित प्रयत्न गरजेचे



प्राजक्ता पाटोळे
बी. ए. भाग-१

नुकत्याच पुलवामामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भ्याडपणाचे लाजिरवाणे स्वरूप समोर आले. एखाद्या देशाने थेट रणांगणात न उतरता असुरक्षित भावनेतून असे हल्ले करणे एक अत्यंत खेदजनक बाब आहे. या भावनेला आणि दहशतवादाला समूळ नष्ट करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### योग्य निर्णय व्हावा



नंदीनी काकडे
बी. ए. भाग-३

आज दहशतवाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. आताच झालेल्या पुलवामा-उरी हल्ल्याची घटना ताजी आहे. त्यामुळे दहशतवाद या विषयावर अंतरराष्ट्रीय स्तरावर विचार करणे गरजेचे आहे आणि त्यातून जगातील दहशतवादांविषयी योग्य निर्णय घेण्याची वेळ आली आहे त्यांचा वेळीच पायबंद घातला पाहिजे.

### वेळीच पायबंद घालावा



सौरभ मोरे
बी.बी.ए. भाग-२

दहशतवादाचा अर्थ भीतीदायक वातावरण तयार करणे. लोकांमध्ये भीतीचे वातावरणच म्हणजेच दहशतवाद. हा दहशतवाद आज जगावर राज्य करू पहात आहे. त्यामुळे याला वेळीच पायंबद घातला पाहिजे. दहशतवादामुळे समाजात सांप्रदायिकता, धर्मांधता निर्माण होत आहे.

### दहशतवाद की फुटीरवाद?



अभिषेक गुरव
बी. ए. भाग-१

प्रश्न वाचायला सोपा पण, विचार करायला लावणारा आहे. कारण या फुटीरवादामुळेच दहशतवाद जन्माला आला असावा, असे मला वाटते. म्हणुनच या फुटीरवादालाच नष्ट करण्यात यावे. कारण फुटीरवाद हा त्या प्रदेशानुसार निर्माण होत असतो. म्हणुनच दहशतवादी अन्य राष्ट्रात जाऊन हल्ला करतात.

### राष्ट्रीय ऐक्य धोक्यात



ऋषिकेश भोसले
बी.बी.ए. भाग-२

असहिष्णुता, सांप्रदायिकता, धर्मांधता, संकीर्ण मानसिकतेमुळे आज समाजामध्ये दहशतवाद फोफावत आहे. त्यामुळे राष्ट्रीय विकासाची गती कमी होत आहे. दहशतवादामुळे दोन राष्ट्रांमधील कलह वाढत आहे. दशतवादामुळे सामाजिक, राष्ट्रीय ऐक्य धोक्यात येते व सामाजिक शांतता नष्ट होते.

### माणूसकीची कीड



नेहा कांबळे,
बी. ए. भाग-१

दहशतवाद हा मानवजातीला लाभलेली एक कीड आहे आणि या किडीचा जोपर्यंत समूळ नाश होत नाही, तोपर्यंत दहशतवाद हा मानवतेची हत्या करणारच यात तीळमात्र शंका नाही. त्यासाठी दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करणे गरजेचे आहे व जागतिक पातळीवर दहशतवादांच्या विरोधात ठोस पाऊल उचलणे गरजेचे आहे.

### देशप्रेम जागृत व्हावे



ऐश्वर्या शहा
बी. ए. भाग-३

आपल्या देशाचे लोक दहशतवादी संघटनांना मिळत आहे आणि आपल्याच देशांमध्ये हल्ला घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहेत. जाती धर्मातील तेढ दहशतवादाला जन्म देते. यामुळे मला असे वाटते की देशांमध्ये जाती-धर्मांमध्ये पडलेल्या भिंती मिटविण्यासाठी शिक्षण पद्धतीतुन देशप्रेम जागृत केले पाहिजे.

### मानवजातीला कलंक



अमृता संकपाळ
बी. ए. भाग-२

ज्या देशात जात-धर्म पाळू नका, मानवजात ही एकच जात आहे असे सांगितले जाते त्याच ठिकाणी दहशतवादामुळे मानवच मानवाची हत्या करू पहात आहे. त्यामुळे दहशतवाद हा मानवजातीला लागलेला एक कलंकच आहे. हा कलंक जोपर्यंत समाजातून नष्ट होत नाही तोपर्यंत दहशतवादाचे समूळ उच्चाटन होणार नाही.

### सामाजिक शांतता नष्ट



गायत्री कांबळे
बी. ए. भाग-१

दहशतवाद हा विशिष्ट उद्देश साध्य करण्यासाठी काही मूठभर लोकांचा समूह आहे. हा समूह धार्मिक कट्टरतेमुळे मानवा-मानवा मध्ये दरी निर्माण करू पहात आहे. त्यामुळे सामाजिक शांतता नष्ट होत आहे. देशाची सामाजिक शांतता टिकविण्यासाठी दहशतवाद नष्ट करण्याशिवाय गत्यंतर नाही.

* मार्गदर्शक : मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, * प्रकाशक व प्रबंध संपादक : प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, * कार्यकारी संपादक : डॉ. दीपक रामा तुपे, डॉ. प्रदीप पाटील.
* सहाय्यक संपादक : प्राजक्ता पाटोळे, नंदीनी काकडे, तेजस्विनी [illegible]ोळे, अनुष्का सावंत, काजल इंडिकर, पूजा कोलकार, पल्लवी कांबळे, अभिषेक गुरव, केतन मिरजकर, अमृता संकपाळ.
* प्रतीक प्रिंटिंग सर्व्हिसेस, कोल्हापूर येथे छापून विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथून प्रसिध्द केले. फोन : (०२३१) २५४३४०२. * या अंकात छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (फक्त खासगी वितरणासाठी)

विवेकNEWS

जानेवारी २०१९

# अविस्मरणीय

## सुसंस्कारी विद्यार्थी घडावा : डॉ. होनगेकर



कोल्हापूर, दि. ४ : विवेकानंद कॉलेजच्या वतीने पालक–शिक्षक मेळावा आयोजित करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी या मेळाव्यात सक्षम व सुसंस्कारी विद्यार्थी घडावा असे आवाहन केले. यावेळी स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक कॉमर्स विभागाच्या प्रमुख डॉ. माधवी चरणकर यांनी केले. डॉ. मंजुश्री घोरपडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार व पालक उपस्थित होते. **शब्दांकन : तेजस्विनी शितोळे**

## माणूसपण जागे करण्यासाठी साहित्य



कोल्हापूर, दि. ५ : विवेकानंद कॉलेजच्या इंग्रजी व वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित व्याख्यान गोवा विद्यापीठाचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. आनंद पाटील यांनी माणूसपण जागे करण्यासाठी साहित्य लिहा असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर हे होते. प्रास्ताविक प्रा. बी. के. गोसावी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय इंग्रजी विभागाच्या प्रा. डॉ. श्रुती जोशी यांनी करून दिला. स्वागत वाङ्मय मंडळाचे प्रमुख डॉ. दीपक तुपे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सविता कोळेकर यांनी केले. यावेळी इंग्रजी विभागातील प्रा. एस. एम. रुईकर, प्रा. पी. पी. गवळी उपस्थित होते. आभार प्रा. डॉ. पी. ए. पाटील यांनी मानले. **शब्दांकन : काजल इंडिकर**

## माडगूळकरांचे साहित्य-संस्कृतीची ओळख



कोल्हापूर, दि. १४ : विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापक प्रबोधिनीच्या वतीने 'आधुनिक वाल्मिकी : ग. दि. माडगूळकर' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात ते म्हणाले की, ज्येष्ठ साहित्यकार व माजी प्राचार्य डॉ. श्रीपाद जोशी यांनी ग. दि. माडगूळकर यांच्या साहित्याने भारतीय संस्कृतीला जिवंत करण्याचे काम केले. माडगुळकरांचे साहित्य खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीची ओळख आहे. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. याय. होनगेकर हे होते. प्रास्ताविक प्रा. एस. टी. सुतार यांनी केले. आभार प्रा. एस. एम. रुईकर यांनी मानले. **शब्दांकन : अंकुश सावंत**


## शैक्षणिक गुणवत्तेसाठी स्वायत्तता महत्त्वाची



कोल्हापूर, दि. १२ : विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापक प्रबोधिनीच्या वतीने स्वायत्तता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात ते म्हणाले की, शैक्षणिक गुणवत्ता व विकासासाठी स्वायत्तता ही गरजेची आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर हे होते. प्रास्ताविक व स्वागत प्रा. एस. एम. रुईकर यांनी केले. आभार आईक्यूएसीच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी मानले.

**शब्दांकन : प्राजक्ता पाटोळे**

## वाचन प्रेरणा दिन उत्साहात



कोल्हापूर, दि. १२ : विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथालय विभाग, मराठी विभाग व वाङ्मय मंडळाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रसिद्ध साहित्यकार कृष्णात खोत यांनी वाचनाने अज्ञान व गुलामगिरी नष्ट करता येते असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर हे होते. प्रास्ताविक डॉ. नीता पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. बी. के. गोसावी यांनी करून दिला. आभार डॉ. दीपक तुपे यांनी मानले. सूत्रसंचालन अनिकेत पाटील याने केले.

**शब्दांकन : प्राजक्ता पाटोळे**

# आई जीवन घडविणारी त्यागमूर्ती

### 'आई' या विषयावर आयोजित व्याख्यानात जयसिंगराव सावंत यांचे प्रतिपादन

कोल्हापूर, दि.२२: आईमुळे जीवनातील अनेक आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य मिळते. जीवनाचे यश व जगण्याचे बळ आईमध्ये असते. संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्यामध्ये साथसोबत करीत संस्थेतील अनेक मुला-मुलींना आईवत प्रेम देत त्यांचे जीवन घडविले. अत्यंत शांत, संयमी, सुस्वभावी धीरोदत्त आणि प्रेमळ असे व्यक्तिमत्त्व म्हणजे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे. त्या जीवन घडवणाऱ्या त्यागमूर्ती व संस्थेच्या कार्याच्या जीवनज्योती होत्या. अशी आई ही जीवन घडविणारी त्यागमूर्ती असते, असे विचार ताराराणी विद्यापीठाच्या ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशनचे अधिव्याख्याता मा. जयसिंगराव सावंत यांनी व्यक्त केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या वतीने संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त 'आई' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी आपल्या आईच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, आईच्या आशिर्वादामुळे व प्रेरणेमुळेच मुलाचे भावी आयुष्य उज्ज्वल होत असते. माझ्या आईनेसुध्दा अनेक मुलांचे संगोपन केले. त्यामुळेच शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात त्यांचे योगदान फार मोठे आहे. बापूजींना साथ-सोबत करीत संस्था उभी करण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम, नि:स्वार्थी भावनेने केलेला त्याग आणि दीनदुबळ्या मुलांवर केलेली माया-ममता हीच त्यांच्या कार्याची थोरवी आहे.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमापूजन व संस्था प्रार्थनेने झाली. प्रास्ताविक विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले. आभार डॉ. ए. एस. महात यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले.



'आई' विषयावर बोलताना प्रा. जयसिंगराव सावंत व इतर मान्यवर.

**शब्दांकन : तेजस्विनी शितोळे**

# संवेदना जाग्या करते रेषेची भाषा

### स्पंदन कार्यक्रमात व्यंगचित्रकार वैजनाथ दुलंगे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर, दि. ६ : रेषांनासुद्धा एक भाषा असते. रेषासुद्धा बोलतात. रेषेची भाषा रेषेच्या माध्यमातून मानवी मनातील भावमुद्रांचे दर्शन घडवितात. मानवी मनातील संवेदना जाग्या करतात. रेषेतूनच कला जन्म घेते आणि कलेमुळेच माणसाच्या गुणांचे दर्शन होते. असे विचार प्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. वैजनाथ दुलंगे, पुणे यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजच्या वतीने आयोजित 'स्पंदन २०१९' कला प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

स्पंदन चे उद्घाटक वाईल्ड लाईफ फोटोग्राफर श्री रमण कुलकर्णी म्हणाले की, फोटोची एक वेगळी भाषा असते. शब्दांची भाषा भाव व्यक्त करण्यासाठी असमर्थ होते तेव्हा फोटो माणसाच्या भावना व्यक्त करतात. माणसांच्या जाणीवा जाग्या करतात.



'स्पंदन २०१९'चे उद्घाटन करताना वाईल्ड लाईफ फोटोग्राफर रमण कुलकर्णी.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, कलेतूनच माणसाचे जीवन उभा राहते. प्रत्येकानी आपल्या आवडीनिवडीची कला जोपासली पाहिजे. कलेच्या माध्यमातूनच माणसाला माणसाच्या संवेदना जाग्या करता आल्या पाहिजेत. त्यावेळी माणसाच्या कलेचे वेगळेपण सिद्ध होते.

स्वागत व प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा वेध घेतला व स्पंदनच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. बी. व्होक व कम्युनिटी कॉलेजचे नोडल ऑफिसर प्रा. सतीश गायकवाड यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन प्रा. राजश्री पाटील यांनी केले. आभार प्रा. श्रद्धा शिंदे यांनी मानले. **शब्दांकन : देवेश इंगवले**

## रक्तदान हे सर्वश्रेष्ठ जीवनदान !

कोल्हापूर दि. २९ : येथील विवेकानंद कॉलेज येथे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान व एक पुण्यकर्म आहे. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये देश बळकटीसाठी रक्ताचं आणि विचाराचं नातं असलं पाहिजे. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी विचार मांडले. छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालयाच्या कर्मचाऱ्यांचे या शिबिरात रक्तसंकलनासाठी सहकार्य लाभले.

**शब्दांकन : पूजा कोलकार**

## अहिल्या चव्हाणचे जागतिक स्पर्धेत यश

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये बी. बी. ए. भाग १ या वर्गात शिकत असलेली खेळाडू कुमारी अहिल्या सचिन चव्हाण हिने इजिप्त येथे झालेल्या जागतिक बायथलॉन स्पर्धेत कास्यपदक व ट्रायथलॉन स्पर्धेत रौप्यपदक मिळविले. त्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, महाविद्याल्याचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, देशपांडे साहेब, न्यायमूर्ती उमेशचंद्र मोरे व ॲडव्होकेट राणिंगा साहेब यांनी आहिल्याचे कौतुक व अभिनंदन केले. तिला तिचे वडील सचिन चव्हाण, जिमखाना विभागप्रमुख प्रा. किरण पाटील, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष कुंडले, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. स्वप्निल खोत यांचे प्रोत्साहन लाभले.

**शब्दांकन : पल्लवी कांबळे**

## बापूजींनी घडविले अनेक पिढ्यांचे संस्कार :डॉ. शिर्के

कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार या ध्येयवादाने प्रेरित होऊन शहरी भागातील व खेड्यापाड्यातील गोरगरीबांच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यातून बापूजींच्या कार्याचा गौरव करण्याचे भाग्य आम्हास लाभले. डॉ. बापूजींनी अनेक पिढ्यांचे ज्ञानसंस्कार घडवले आहेत. असे विचार शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

ते विवेकानंद कॉलेज येथील माजी विद्यार्थी असोसिएशनच्या वतीने आयोजित स्नेहमेळाव्याचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.



माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व इतर.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी विवेकानंद कॉलेजच्या स्थापनेपासूनच्या जुन्या आठवणी सांगितल्या. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कॉलेज स्थापनेच्या पहिल्या बॅचच्या म्हणजे १९६४ च्या माजी विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी माजी महापौर महादेवराव आडगुळे, प्रा. रमेश जाधव, मा. पी. सी. पाटील, मा. ऋतुराज क्षीरसागर, श्री. आर. एस. भोगम, न्यायाधीश पंकज रजपूत यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी श्री. आर. एस. भोगम यांचे माझा जीवनप्रवास या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. याप्रसंगी शाहीर आझाद नाईकवाडी, डॉ. शरदचंद्र साळुंखे, प्रा नंदकुमार रानभरे, माजी विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रभावती पाटील व प्रा राजश्री पाटील यांनी केले. आभार प्रा. धीरज शिंदे यांनी मानले.

**शब्दांकन : नंदीनी काकडे**

## राष्ट्रीय ऐक्यातून देशाची प्रगती: प्राचार्य साळुंखे

कोल्हापूर, दि.२६ : देशासाठी लढणाऱ्या शूरवीरांनी व स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाने देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्वातंत्र्य, समता, बंधूभाव, एकसंध राष्ट्र व मानवतेचा संदेश देणाऱ्या घटनेने या देशाला सामाजिक सुरक्षितता, सहिष्णुता व स्थैर्य प्राप्त करून दिले. आजच्या युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतिपथाकडे न्यावा, असे आवाहन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी ७०व्या प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहणप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना काढले. यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे या उपस्थित होत्या. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी शानदार परेड संचलन, सर्जिकल स्ट्राईकची प्रात्यक्षिके सादर करून राष्ट्रीयत्वाची भावना जागृत केली.



याप्रसंगी पुणे बालेवाडी येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत विवेकानंदचा विद्यार्थी तुषार सातपूते याने ज्युदो स्पर्धेत कास्यपदक मिळविल्याबद्दल सत्कार करणेत आला. संयोजन जिमखानाप्रमुख प्रा. किरण पाटील, कॅप्टन सौ. सुनिता भोसले, प्रा. संतोष कुंडले, प्रा. श्रीमती शहिदा कच्छी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. किरण पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी केले तर आभार प्रा. बी. एस. लाड यांनी मानले.

**शब्दांकन : पूजा कोलकार**

## मानसिक आरोग्य दिन साजरा

कोल्हापूर, दि.९ : विवेकानंद कॉलेज, मनस्पंदन फौंडेशन, वुई केअर सोशल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मनस्पंदन फौंडेशनचे अध्यक्ष प्रा. नंदकुमार रानभरे यांनी मानसिक आरोग्यासाठी सुसंवाद महत्त्वाचा आहे असे सांगितले. अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर हे होते. यावेळी अमृता जोशी यांनी मानसिक आरोग्यदिनाची पार्श्वभूमी सांगितली. संध्या वाणी यांनी युवकांच्या विविध प्रश्नांसंबंधी चर्चा घडवून आणली. यावेळी युवामंथन चित्रफितीद्वारे प्रबोधन करण्यात आले. या प्रसंगी मनिषा धमोणे व सलमान मुजावर यांनी मार्गदर्शन केले. आभार प्रा. एस. एम. रूईकर यांनी मानले.

**शब्दांकन : केतन मिरजकर**

